# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १३३५/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री.वामन एकनाथ उगले,**
प्रगती चाळ नं.२, रूम नं.४, घर नं.८६८६,
सावंत पार्कच्या मागे, खदानजवळ,
महालक्ष्मीनगर, अंबरनाथ पूर्व ४२१ ५०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख,
कोव्हिड कंट्रोल रूम विभाग, अंनप,अंबरनाथ
नगरपरिषद अंबरनाथ,ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख,
कोव्हिड कंट्रोल रूम विभाग, अंनप, अंबरनाथ
नगरपरिषद अंबरनाथ,ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २३.०९.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०६.२०२१ | -- | २८.०७.२०२१ | १०.०८.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि. ०९.०६.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *"अपूर्ण माहिती पुरविली असून, हेतुपुरस्सर मुद्याम टाळाटाळ करित आहेत."* असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २३.०९.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शशांक शांताराम तळवटकर व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अमोल मानकर, विभाग प्रमुख (सा.प्र.) अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"

*१) वडवली ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या सर्व-कामांसदर्भातील मासिक सभा व ग्रामसभा यांचे प्रोसिडिंग मिळावेत.*

*२) ग्रामपंचायत फंडाचे तसेच सर्व योजनांचे अंदाजपत्रक, कॅशबुक, पासबुक, पासबुक काउंटर फाईल्स, व्हाऊचर यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात.*

*३) सदर झालेल्या कामांसदर्भातील मागविलेली दरपत्रके काढण्यात आलेल्या निविदा (टेंडर्स, ई-टेंडर्स व वृत्तपत्रीय निविदा प्रसिध्दी पत्रके यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात.*

*४) सदर झालेल्या कामांसदर्भातील मुल्यांकने एम.बी.रेकॉर्डीग बुकाच्या प्रती, टेस्ट रिपोर्ट मिळावेत.*

*५) सदर कामांची (पूर्ण व अपुर्ण) अंदाजपत्रके (Estimate) मिळावित.*

*६) सदर झालेल्या कामांचे ऑडिट रिपोर्ट व त्याचे वार्षिक अहवाल मिळावेत.*

*७) १९ जुलै २०१६ ते आजतागायत आपल्या ग्रामपंचायत हद्दीतील कोण कोणत्या कंपनीकडून CSRफंड किती प्राप्त झाला व त्याद्वारे कोणती विकास कामे केली त्याचा तपशिल मिळावा.*

*८) वडवली ग्रामपंचायत हद्दीतील एस.एल.प्रोपॅक कंपनीने नविन केलेल्या बांधकामाची परवानगी घ्रेतली आहे का? असेल तर त्याचे असेसमेंट ची छायांकित प्रत व एन.ओ.सी.ठरावाची प्रत मिळावी व सदर कंपनीला आकारण्यात आलेल्या सर्व नविन व जुन्या घरपट्टीच्या प्रती मिळाव्यात. "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहिती दि.२२.०७.२०२१ रोजी पुरविण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी काही अतिरिक्त माहिती उपलब्ध असल्यास तक्रारकर्ता यांना कळविण्याचे आदेश दिले होते. परंतु कोणतीही अतिरिक्त माहिती उपलब्ध नसल्याने, तक्रारकर्ता यांना नवीन पत्र देण्यात आलेले नाही.

तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती विहित मुदतीत देण्यात आलेली असल्यामुळे, सदर प्रकरणात पुढील कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ सप्टेंबर, २०२४ .

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ